


साप्ताहिक

संघर्षाचा आवाज

प्रशासकीय व सामाजिक व्यवस्थेचा समतोल साधणारा...

पुणे, ठाणे आणि मुंबईसह महाराष्ट्रातील घडामोडींचा वेध घेणारे वृत्तपत्र

संपादक : संजय सोनवणे

■ RNI. NO. MAHMAR/2013/52905
■ DECL. NO. SDM/SR/11/2013
■ https://sangharshachaaawaz.in

■ वर्ष : १४ वे ■ अंक : १३ वा ■ सोमवार दि.१९ ऑक्टोंबर ते २५ ऑक्टोंबर २०२६ ■ किंमत : २ रु. ■ पाने – ०४

निवडणूक आयोगावरील... पान २ वर | धम्म विजयादशमी... पान ३ वर | आयडीबीआय बँकेची विक्री... पान ४ वर

अत्यावश्यक कामाची गरज नसताना करोडो रूपयांच्या कामातून खिसे भरण्याचे काम चालु आहे का?









पथ विभागाची जागा घेत असताना सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा कसबा-विश्रामबागवाडा सहाय्यक आयुक्त यांनी कोणत्याही प्रकारची विचारणा न करताच अशा पध्दतीने वॉल कंपाऊंड बाधणे योग्य नाही.

- मा.राजेश बनकर पथ विभागाचे मुख्य अभियंता

सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.३ यांच्याकडून कसबा-विश्रामबागवाडा सहाय्यक आयुक्त यांना ना-हरकत दाखला संदर्भात पत्रव्यवहार करण्यात आला. त्यामध्ये अनुसूचित जाती व जमातीचा उल्लेख चुकून आला आहे.

- मा.सौ.जान्हवी रोडे, उपअभियंता सा.बा.

पर्यटन विकासासाठी मुलभूत सुविधा पुरविणेकरिता अुनदान देण्यात आले. ते नक्कीच योग्य ठिकाणी वापरण्यात आले आहे का हा प्रश्नच आहे.

- स्थानिक नागरिक

या कामामध्ये नदीपात्रात काम करण्यात येणार आहे. यासंदर्भात पाठबंधारे खात्याची परवानगी घेतली नसल्याचे दिसून येत आहे. तसेच पुणे शहरामध्ये नदीसुधार योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात कामे चालू आहेत.

पुणे : विधानपरिषदेच्या पुणे पदवीधर, शिक्षक मतदारसंघाची आचारसंहितेच्या नावाखाली पुणे महापालिकेच्या अनेक अत्यावश्यक कामांना फटका बसला आहे. तर दुसरीकडे ओंकारेश्वर घाट शनिवार पेठ व ओंकारेश्वर मंदीर शनिवार पेठ येथे नुतनीकरण करणे. (फरशी बसविणे, रंगकाम करणे, दगडी फुटपाथ बसविणे, शेड बांधणे, कंपाऊंड वॉल बांधणे, बॉलपेंटींग करणे, पाणीपुरवठा व्यवस्था, ड्रेनेज लाईन दुरूस्ती, समाधी स्थळ दुरूस्ती, नदीकाठ सुधारणा इत्यादी,) भाग-१- रक्कम रूपये ५० लाख असे एकूण चार भाग करण्यात आले आहेत. या कामाची एकूण किंमत २ कोटी होत आहे. या कामाला कोणत्याही आचारसंहितेची नियमावली दिसत नाही. हे काम सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे यांच्या अंतर्गत असलेले उपविभाग क्र.३ यांच्या माध्यमातून जोरदार चालू आहे. यामध्ये मा.खासदार महोदयांनी प्रस्तावित केलेली कामे यापुर्वी कोणत्याही योजनेतून घेण्यात आलेले नाही. तसेच हे काम राज्य/केंद्र/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या इतर योजनेत प्रस्तावित/मंजूर केलेले नाही. सदरचे काम हे मूळ काम असून मोठया कामाचे तुकडे प्रस्तावित नाही अशी नोंद केलेली असताना कोणत्याही नियमाची अंमलबजावणी होताना दिसत नाही? सर्वात महत्वाचे म्हणजे या कामाची चौकशी करत असताना संबंधित अधिकाऱ्यांनी दाखवलेले फोटो आणि आंम्ही काढलेले फोटो या मध्ये मोठा फरक दिसत आहे. मुळात या ठिकाणी अत्यावश्यक कामाची गरज नसताना करोडो रूपयांची कामे चालू आहेत. विशेष या कामाच्या ठिकाणी कंपाऊड वॉल बांधत असताना पुणे महापालिकेच्या पथ विभागाला कोणत्याही प्रकारची विचारणा करण्यात आलेली नाही. यामध्ये सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.३ यांच्याकडून दि.३०/६/२०२५ रोजी पुणे महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त कसबा-विश्रामबागवाडा क्षेत्रीय अधिकारी यांना ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे. यावर कसबा-विश्रामबागवाडा सहाय्यक आयुक्तांनी दि.२/७/२०२५ रोजी ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे. यापत्रामध्ये विशेष काही मुद्दे दिसून आले. जसे की, मुद्दा क्र.३ यामध्ये म्हणतात की, खालील कामांच्या जागा पाहणी केली असता सदर ठिकाणी अनुसूचित जाती व जमातींची संख्या १५० पेक्षा जास्त आहे. सदरची कामे पुर्ण झाल्यानंतर त्याचा फायदा अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांकरिता होणार आहे. यावर त्यांचे उत्तर होते. की चुकून झाले आहे. दुसरा महत्वाचा मुद्दा क्र.५ हे काम शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकीच्या जागेवर असून कामाचे स्वरूप सार्वजनिक आहे. सदर जागेवर कोणतेही आरक्षण नाही तसेच सदर जागा कोणत्याही धार्मिक क्षेत्राशी/बाबीशी/संस्थेशी संबंधित नाही. या कामाकरिता पुणे महानगरपालिका पुणे यांचे मालकीची जागा उपलब्ध असून जागेबाबत आवश्यक अभिलेखे या सोबत सादर करण्यात येत आहे. प्रस्तावित काम हे शासकीय जागेवरच करण्यात येईल याबाबतची हमी देण्यात येत आहे. यासंदर्भातही अनेक प्रश्न उदभवत आहे. याठिकाणी सुरूवातीला कै.मा.गिरीष भालचंद्र बापट यांच्या निधीतून काम केल्याची पाटी लावण्यात आली आहे. तसेच या आतील बाजूस जिथे पिंडदान करण्याचे ठिकाण आहे तिथे मुक्ती हॉलची निर्मिती आमदार श्री.अनंतराव गाडगीळ यांच्या संकल्पनातून अश्या नावाची पाटी लावण्यात आली आहे. तसेच याठिकाणी विशेष पाटी बसवण्यात आली आहे. त्यावर अशी माहिती देण्यात आली आहे की, नाविण्यपुर्ण उपक्रम आता आपल्याला पिंड विर्सजन करण्यासाठी गर्दीचा रस्ता क्रॉस (पान ४ वर)

बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया पुणे केंद्रा तर्फे बांधकाम मजुरांच्या गुणवंत मुलांचा सन्मान

पुणे : प्रतिकूल परिस्थितीत आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून शिक्षणात यश मिळवणाऱ्या बांधकाम कामगारांच्या गुणवंत मुलांचा 'बिल्डर असोसिएशन ऑफ इंडिया', पुणे केंद्रातर्फे सत्कार करण्यात आला.



यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये श्री.दत्तात्रय पवार - सहाय्यक कामगार आयुक्त पुणे, श्री.अजयकुमार लोळगे - संचालक अजयश्री सोशल फाऊंडेशन, श्री.अजय गुजर - अध्यक्ष BAI पुणे केंद्र, श्री.राजाराम हजारे - उपाध्यक्ष BAI पुणे केंद्र, डॉ.महेश राठी - सचिव BAI पुणे केंद्र, श्री. सुशिल अग्रवाल - कोषाध्यक्ष BAI पुणे केंद्र दत्तात्रय पवार यांनी बांधकाम कामगारांसाठी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक मदत, सामाजिक सुरक्षा, मातृत्व लाभ आणि निवृत्तीवेतन योजनांची माहिती दिली. पात्र कामगारांनी मंडळाकडे नोंदणी करून योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यशासाठी कष्ट आणि शिक्षणाला पर्याय नाही, असेही त्यांनी सांगितले.

अजयकुमार लोळगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, शैक्षणिक सहकार्य आणि इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध करून देण्याची सूचना केली. विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा आणि कौशल्याचा उपयोग समाजासाठी करावा, असेही ते म्हणाले.

अजय गुजर, अध्यक्ष, BAI पुणे केंद्र यांनी शिक्षणाचा पाया भक्कम ठेवून मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी मेहनत घ्यावी, असे आवाहन केले.

यावेळी BAI चे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष रणजीत मोरे, महाराष्ट्राचे माजी अध्यक्ष जगन्नाथ जाधव, पुणे कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष रविंद्र भोसले व रयत शिक्षण संस्थेच्या पुणे विभाग सदस्य व निसर्ग ऋण फाऊंडेशनच्या अध्यक्ष अर्चना सोनावणे, BAI पुणे चे मान्यवर सभासद व इतर अतिथी उपस्थित होते.

संपादकीय...

निवडणूक आयोगावरील आरोपांना राष्ट्रीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणले?

१० ऑक्टोबर रोजी दिल्लीमध्ये आंदोलनाला मोठे स्वरूप प्राप्त झाले. कॉंकरोच जनता पार्टीच्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी निघालेले अनेक कार्यकर्ते आणि विरोधी पक्षांचे नेते पोलिसांच्या कारवाईला सामोरे गेले. ममता बॅनर्जी, अरविंद केजरीवाल आणि पिनराई विजयन यांच्यासारख्या माजी मुख्यमंत्र्यांनाही ताब्यात घेण्यात आले. हजारो लोकांना ताब्यात घेतल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले.

या पार्श्वभूमीवर १२ ऑक्टोबर रोजी विरोधी पक्षांचे आंदोलक सर्वोच्च न्यायालयाच्या दिशेने मोर्चा घेऊन गेले. मतदार याद्यांमधील कथित अनियमिततेची चौकशी, वगळलेल्या नावांचे परीक्षण आणि नागरिकांच्या मतदानाच्या हक्कांचे संरक्षण यांसारख्या मागण्या पुढे आल्या. या दिवशीचा मोर्चा कडक सुरक्षा व्यवस्थेत पार पडला.

येथे एक महत्त्वाचा घटनात्मक प्रश्न उपस्थित होतो. कायदा-सुव्यवस्था राखणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे; परंतु शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या नागरिकांना त्यांचा आवाज मांडता येईल, याची काळजी घेणेही लोकशाही व्यवस्थेसाठी तितकेच आवश्यक आहे.

आंदोलनकर्त्यांनी कायद्याचे पालन केले पाहिजे आणि पोलिसांनीही कायद्याच्या चौकटीतच कारवाई केली पाहिजे. कोणत्याही बाजूला अमर्याद अधिकार नाहीत.

या आंदोलनाला राजकीय पाठिंबा मिळाल्यानंतर त्याचे स्वरूप बदलले. काँग्रेस नेते राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे आणि प्रियांका गांधी वाड्रा यांनी तरुणांच्या आंदोलनाला पाठिंबा व्यक्त केला. आम आदमी पक्षाचे अरविंद केजरीवाल आणि संजय सिंह यांच्यासह अन्य नेत्यांनीही या मुद्द्यावर सरकार आणि निवडणूक आयोगावर टीका केली. ममता बॅनर्जी यांनी आंदोलनात सहभागी होत ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीला पाठिंबा दिला.

सर्वोच्च न्यायालयाने विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीशी संबंधित याचिकांसह ४६ याचिकांच्या समूहावर सुनावणीदरम्यान निवडणूक आयोग, ज्ञानेश कुमार आणि अन्य निवडणूक आयुक्तांकडून उत्तर मागवले. मतदार नोंदणीसाठी वापरल्या जाणाऱ्या फॉर्म ६ मधील बदल आणि दिल्ली पोलिसांनी जंतरमंतरला अधिकृत आंदोलनस्थळाच्या यादीतून वगळल्याच्या निर्णयाचे परीक्षण करण्यासही न्यायालयाने सहमती दर्शवली. आंदोलनादरम्यानच्या सीसीटीव्ही चित्रणाचे जतन करण्याचे निर्देशही देण्यात आले.

न्यायालयाने संबंधित प्रश्नांवर उत्तर मागवणे आणि त्यांची कायदेशीर तपासणी करणे ही न्यायप्रक्रियेतील महत्त्वाची पायरी आहे.

परंतु यामुळे एक गोष्ट स्पष्ट होते: निवडणूक प्रक्रियेबाबत उपस्थित झालेले प्रश्न आता केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोपांपुरते राहिलेले नाहीत. मतदार यादीतून नाव काढण्याचे निकष काय होते? नागरिकांना पूर्वसूचना देण्यात आली का? हरकत नोंदवण्याची संधी मिळाली का? फॉर्म ६ मधील बदल कोणाच्या मान्यतेने झाले? आंदोलनासाठी निर्धारित स्थळांबाबतचे निर्णय कायदेशीर होते का? या प्रश्नांची उत्तरे अधिकृत नोंदी आणि न्यायालयीन परीक्षणातून मिळाली पाहिजेत.

या आंदोलनाचे पडसाद परदेशातही उमटले. १६ ऑक्टोबर रोजी लंडनमधील भारतीय उच्चायुक्तालयाबाहेर विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. १७ ऑक्टोबर रोजी लंडनच्या पार्लमेंट स्केअर परिसरातही ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी निदर्शने झाल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले. विरोधी पक्षांनी केवळ राजीनाम्याच्या घोषणा देण्याऐवजी पुरावे, आकडेवारी आणि ठोस पर्याय जनतेसमोर मांडले पाहिजेत. सरकारनेही आरोपांना केवळ राजकीय कट म्हणत नाकारण्याऐवजी तथ्याधारित उत्तरे दिली पाहिजेत.

१२ ऑक्टोबरपासून १८ ऑक्टोबर २०२६ पर्यंतच्या घडामोडींनी निवडणूक आयोगावरील विश्वास, मतदार याद्यांची पारदर्शकता, आंदोलनाचा अधिकार आणि केंद्र सरकारची जबाबदारी हे मुद्दे राष्ट्रीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणले आहेत.


साप्ताहिक संघर्षाचा आवाज मालक – यशोदा उत्तरेश्वर सोनवणे, यांनी सा. संघर्षाचा आवाज संपादक, मुद्रक, प्रकाशक संजय सोनवणे यांना सर्व अधिकार दिले आहे. त्यांनी श्री साई ग्राफिक्स, डी. एस. के. चिंतामणी कॉम्प्लेक्स. विंग – सी – २, शॉप नं. ३८, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० येथे छापून सर्व्हे नं. ८, नेताजीनगर, येरवडा, पुणे – ४११००६ येथून प्रकाशित केले.

Yashoda Uttareshwar Sonwane, the owner of Weekly Sangharshacha Aawaz, has given all rights to the Sanjay Uttareshwar Sonwane, editor, printer, publisher of Weekly Sangharshacha Aawaz. This weekly is printed at Shri Sai Graphics, D. S. K. Chintamani Complex, Wing C-2, Shop No. 38, Shaniwar Peth, Pune - 411030 and published at Survey No. 8 Netajinagar, Yerawada, Pune - 411006.

या साप्ताहिकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयांतर्गत सोडवली जातील अन्यत्र कोठेही नाही.

आपल्या प्रतिक्रिया येथे नोंदवाव्यात
Email : sangharshachaaawaz22@gmail.com
Email : sangharshachaaawaz@rediffmail.com
Mob. : 7276871008 / 9665487134



मागील अंकावरून

दुसऱ्याचे नुकसान करण्याची इच्छा धरणारे, वाईट मित्र, सोबती ही सहा कारणे मनुष्याच्या सत्यानाशास कारणीभूत ठरतात.

ज्याचे मित्र व सहयोगी, सोबती जर पापानी बरबटले असतील तर तो दोन्ही जगात नष्ट–भ्रष्ट होईल. या लोकात व परलोकात देखील जुगार, परनारीगमन, दारू, नाच, गाणे, दिवसभर झोप. अनेक गल्ली बोळांत फिरणे, वाईटाची संगत, परकोटीचा लोभ अशा एकूण नऊ कारणांनी मनुष्य बरबाद होतो. नेस्तनाबूत होतो.

जो जुगार खेळतो, जो नशापाणी करतो, परस्त्रीशी अनैतिक संबंध ठेवतो. जो नीच लोकांची संगत करतो, ज्ञानी लोकांची संगत करित नाही, त्यांचा सहवास टाळतो त्याची अधोगती होते. जशी कृष्ण पक्षातील चंद्राची कला. **क्रमश:**

सिगोलवाद सुत्त

मला उपलब्ध वाङमयाद्वारे धर्मासंबंधी जे ज्ञान प्राप्त झाले. त्याचे सर्वासाठी विवरण करावे असे वाटले आणि धम्मप्रचाराच्या कामास सुरूवात करावी असे वाटले. विचार मनाना भावला लिखाणाचे अंग नोकरीत असल्यापासून आहे, धम्मासंबंधी मला पटलेल्या लहान विषयावर आधारित बाबी पुस्तकरूपाने समाजास देणे ही योजना आहे. भगवंताच्या सुत्तातील अर्थ मला समजला तसा मी मांडला आहे, अर्थात माझ्या आचरणाला धर्म मी सांगतोय. मला लेखक व्हायचे नाही. धम्माच्या आचरणाद्वारा प्रचार करावयाचा आहे. त्यासाठी माझ्या बुध्दीनुसार, आकलनानुसार मी प्रयत्न करण्याचे धाडस केले आहे व ते पुढेही चालू ठेवणार आहे. प्रोत्साहन मिळाल्यास माझाही हुरूप वाढेल व पुढील काम विनाविलंबाने करीन.

जयभीम!

उत्तमराव सोनवणे



धम्म विजयादशमी : सम्राट अशोकांच्या धम्म विजयापासून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मदीक्षेपर्यंत - डॉ. राजेंद्र बगाटे

मानवी इतिहासात काही घटना केवळ एखाद्या काळापुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर त्या पुढील अनेक पिढ्यांना विचार करण्याची, अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची आणि नव्या समाजनिर्मितीची प्रेरणा देतात. सम्राट अशोकाचा धम्म विजय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारलेला बौद्ध धम्म हे भारतीय इतिहासातील असेच दोन महत्त्वपूर्ण संदर्भ आहेत. एका बाजूला युद्धातून झालेल्या विनाशाची जाणीव झाल्यानंतर सम्राट अशोकाने नैतिक मूल्यांना राज्यकारभाराच्या केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न केला; तर दुसऱ्या बाजूला जातीय विषमता आणि अस्पृश्यतेच्या अन्यायकारक व्यवस्थेला आव्हान देत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचा नवा मार्ग स्वीकारला. या दोन्ही ऐतिहासिक प्रवाहांचा केंद्रबिंदू माणसाचे कल्याण, करुणा, विवेक, समता आणि बंधुता हा आहे. धम्म विजयादशमीच्या निमित्ताने या विचारांचा मागोवा घेणे म्हणजे केवळ इतिहासाचे स्मरण करणे नव्हे, तर वर्तमानातील सामाजिक आव्हानांसमोर मानवी मूल्यांची भूमिका पुन्हा अधोरेखित करणे होय.

प्राचीन भारताच्या इतिहासात सम्राट अशोकाचे स्थान विलक्षण महत्त्वाचे आहे. मौर्य साम्राज्याचा विस्तार करणारा एक सामर्थ्यशाली शासक म्हणून त्याची सुरुवातीची ओळख होती. मात्र कलिंग युद्धानंतर त्याच्या जीवनदृष्टीत महत्त्वपूर्ण परिवर्तन घडले. इ.स.पूर्व तिसऱ्या शतकात झालेल्या या युद्धात मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाली. अनेक लोक मृत्युमुखी पडले, अनेकांना कैद करून नेण्यात आले आणि असंख्य कुटुंबांचे जीवन विस्कळीत झाले. युद्ध जिंकूनही त्यातून निर्माण झालेल्या दुःखाची आणि मानवी हानीची जाणीव अशोकाला झाली. त्याच्या तेराव्या प्रमुख शिलालेखात कलिंग युद्धाच्या परिणामांविषयी आणि त्यानंतर त्याला झालेल्या पश्चात्तापाविषयी उल्लेख आढळतो. या अनुभवाने विजयाच्या पारंपरिक संकल्पनेला प्रश्न विचारण्याची प्रेरणा दिली. शत्रूच्या भूमीवर सत्ता मिळविणे हा विजय असू शकतो; परंतु त्या विजयासाठी असंख्य निरपराधांचे जीवन उद्ध्वस्त होत असेल, तर त्याचे नैतिक मूल्य काय, हा प्रश्न अशोकाच्या धम्मविषयक भूमिकेतून पुढे येतो.

अशोकाने युद्धविजयापेक्षा धम्मविजयाला अधिक महत्त्व दिले. धम्मविजय म्हणजे केवळ सैन्याच्या सामर्थ्याने प्रदेश जिंकणे नव्हे, तर सदाचार, करुणा, सत्यनिष्ठा, सहिष्णुता आणि लोककल्याण यांच्या माध्यमातून माणसांची मने जिंकणे होय. या विचारात सत्तेच्या वापराला नैतिक जबाबदारीची जोड देण्यात आली. शासकाचे मोठेपण केवळ त्याच्या साम्राज्याच्या विस्तारावर किंवा सैन्याच्या सामर्थ्यावर अवलंबून नसून तो आपल्या प्रजेच्या जीवनात किती सुरक्षितता, न्याय आणि कल्याण निर्माण करतो, यावरही ठरते. अशोकाच्या धम्मविषयक भूमिकेतून राज्यकारभाराच्या उद्दिष्टांकडे पाहण्याची नवी दृष्टी विकसित झाली. सत्ता ही लोकांवर वर्चस्व गाजविण्याचे साधन नसून लोकांच्या हितासाठी वापरली जाणारी जबाबदारी आहे, हा विचार त्याच्या ऐतिहासिक वारशाचा महत्त्वाचा भाग आहे.

सम्राट अशोकाने मांडलेला धम्म हा कोणत्याही एका धार्मिक समुदायापुरता मर्यादित नव्हता. त्यात आई-वडिलांचा आदर, वडीलधाऱ्यांशी सन्मानाने वागणे, सेवकांशी न्याय्य व्यवहार करणे, सत्य बोलणे, प्राणिमात्रांविषयी दया बाळगणे, आत्मसंयम राखणे आणि विविध धार्मिक परंपरांविषयी आदर ठेवणे अशा नैतिक मूल्यांना महत्त्व होते. वेगवेगळ्या विचारांचे आणि श्रद्धांचे लोक समाजात एकत्र राहतात, तेव्हा परस्परांचा अवमान करण्याऐवजी एकमेकांच्या मतांचा आदर करणे आवश्यक असते, अशी भूमिका अशोकाच्या शिलालेखांतून दिसते. आजच्या काळात धार्मिक, भाषिक, जातीय आणि सांस्कृतिक विविधतेने नटलेल्या भारतासाठी हा विचार विशेष महत्त्वाचा आहे. मतभिन्नता ही समाजजीवनाचा स्वाभाविक भाग आहे; मात्र मतभिन्नतेचे रूप द्वेष, हिंसा किंवा सामाजिक बहिष्कारात बदलू नये, यासाठी नैतिक विवेक आणि सहिष्णुता आवश्यक असते.

अशोकाच्या धम्मविजयाचा विचार त्याच्या लोककल्याणकारी कार्याशीही जोडलेला आहे. त्याच्या शिलालेखांत मानवांसाठी तसेच प्राण्यांसाठी वैद्यकीय सुविधांची व्यवस्था, प्रवासमार्गांवर विहिरी आणि वृक्षारोपण, प्रशासकीय अधिकाऱ्यांना लोकांच्या हिताची काळजी घेण्याचे निर्देश अशा उपाययोजनांचे संदर्भ आढळतात. शासन आणि समाज यांच्यातील संबंध केवळ करसंकलन, कायदा आणि दंड यांपुरते मर्यादित नसावेत, तर लोकांच्या जीवनमानात सुधारणा घडविणे हेही शासनाचे कर्तव्य असावे, अशी जाणीव या भूमिकेतून व्यक्त होते. अशोकाचा ऐतिहासिक अनुभव आजच्या प्रशासनालाही प्रश्न विचारतो. विकासाची मोजणी केवळ आर्थिक वाढ, पायाभूत सुविधा किंवा सत्तेच्या विस्ताराने करायची की सामान्य माणसाला मिळणारे आरोग्य, शिक्षण, न्याय, सुरक्षितता आणि प्रतिष्ठा यांनाही तितकेच महत्त्व द्यायचे, हा प्रश्न धम्मविजयाच्या विचारातून उपस्थित होतो.

या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मदीक्षेकडे पाहिले, तर भारतीय समाजपरिवर्तनाच्या इतिहासातील आणखी एक निर्णायक अध्याय समोर येतो. डॉ. आंबेडकरांचे संपूर्ण जीवन जातीय विषमता, अस्पृश्यता आणि सामाजिक अन्यायाविरुद्धच्या संघर्षाने व्यापलेले होते. शिक्षण, सार्वजनिक सुविधा, रोजगार आणि सामाजिक प्रतिष्ठा या क्षेत्रांत समान अधिकार मिळविण्यासाठी त्यांनी सातत्याने लढा दिला. स्वतः उच्च शिक्षण प्राप्त करूनही जातीय पूर्वग्रहांमुळे अपमान सहन करावा लागल्याचा अनुभव त्यांच्या विचारविश्वाला आकार देणारा ठरला. त्यांच्या दृष्टीने जातिव्यवस्था ही केवळ व्यक्तींच्या वर्तनातील काही चुकीच्या सवयींची बाब नव्हती; ती समाजातील अधिकार, संधी, प्रतिष्ठा आणि मानवी संबंध यांची विषम विभागणी करणारी व्यवस्था होती. त्यामुळे समाजपरिवर्तनासाठी व्यक्तीच्या विचारांमध्ये आणि सामाजिक संस्थांच्या रचनेमध्ये दोन्ही स्तरांवर बदल घडविणे आवश्यक होते.



डॉ.राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्र, पाली व बौद्ध साहित्याचे अभ्यासक आहेत)
ईमेल – bagate.rajendra5gmail.com

१९३५ मध्ये येवला येथे झालेल्या परिषदेत डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्मात जन्मलो असलो, तरी हिंदू म्हणून मरणार नाही, अशी ऐतिहासिक घोषणा केली. ही घोषणा केवळ भावनिक प्रतिक्रिया नव्हती, तर दीर्घकाळ केलेल्या सामाजिक निरीक्षणाचा, वैचारिक अभ्यासाचा आणि समतेच्या पर्यायी मार्गाच्या शोधाचा परिणाम होती. त्यांनी विविध धर्मांचा अभ्यास करून त्यांच्या तत्त्वज्ञानाचा आणि सामाजिक परिणामांचा विचार केला. माणसाला समान प्रतिष्ठा मिळते का, विवेकाला स्थान आहे का, अन्यायकारक रूढींना प्रश्न विचारता येतात का आणि समाजात बंधुता निर्माण करण्याची क्षमता आहे का, हे प्रश्न त्यांच्या विचारप्रक्रियेत महत्त्वाचे होते. बौद्ध धम्मातील प्रज्ञा, करुणा आणि समता या मूल्यांमध्ये त्यांना मानवी मुक्तीचा आणि सामाजिक परिवर्तनाचा आधार दिसला. त्यामुळे धम्मस्वीकार हा त्यांच्या आयुष्यातील स्वतंत्र धार्मिक निर्णय असण्याबरोबरच अन्यायकारक सामाजिक व्यवस्थेविरुद्धचा विचारपूर्वक घेतलेला निर्णय होता.

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी धम्म विजयादशमी दिनी नागपूर येथील दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. भदंत चंद्रमणी यांनी त्यांना त्रिशरण आणि पंचशील दिले. त्यानंतर डॉ. आंबेडकरांनी आपल्या अनुयायांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली. त्या काळातील सामाजिक परिस्थिती लक्षात घेतली, तर या घटनेचे महत्त्व अधिक स्पष्ट होते. जातीय भेदभाव आणि अस्पृश्यतेच्या अनुभवातून बाहेर पडत मोठ्या संख्येने लोकांनी समान प्रतिष्ठा, विवेकनिष्ठ जीवन आणि बंधुत्वाच्या मूल्यांवर आधारित नवा मार्ग स्वीकारला. हा प्रसंग केवळ धार्मिक विधी नव्हता; तो आत्मसन्मानाचा सार्वजनिक आविष्कार आणि सामाजिक समतेच्या दिशेने उचललेले ऐतिहासिक पाऊल होते. दीक्षाभूमीवरील घटना आजही सामाजिक न्याय, स्वाभिमान आणि परिवर्तनाच्या आकांक्षेचे प्रतीक मानली जाते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुयायांना दिलेल्या बावीस प्रतिज्ञांना या धम्मदीक्षेत विशेष महत्त्व आहे. या प्रतिज्ञांमधून अंधश्रद्धा, कर्मकांड आणि जातीय विषमता यांपासून दूर जाण्याचा, बुद्धांच्या शिकवणीचा स्वीकार करण्याचा आणि समतेच्या मूल्यांशी बांधिलकी ठेवण्याचा संदेश मिळतो. कोणतीही परंपरा केवळ पूर्वापार चालत आली आहे म्हणून तिचे अंधानुकरण न करता तिची चिकित्सा करणे आवश्यक आहे, ही विवेकनिष्ठ भूमिका त्यातून व्यक्त होते. माणसाच्या प्रतिष्ठेला बाधा आणणाऱ्या रूढी नाकारणे, नैतिकतेच्या आधारावर जीवन जगणे आणि स्वतःच्या कृतींची जबाबदारी स्वीकारणे हे या प्रतिज्ञांचे महत्त्वाचे पैलू आहेत. धम्माचा स्वीकार म्हणजे केवळ नाव किंवा धार्मिक ओळख बदलणे नव्हे; तर विचार, वर्तन आणि सामाजिक संबंधांमध्ये परिवर्तन घडविण्याची बांधिलकी स्वीकारणे होय. त्यामुळे बावीस प्रतिज्ञांचे महत्त्व त्यांच्या शब्दांपुरते न ठेवता दैनंदिन जीवनात त्यांचा अर्थ समजून घेण्यात आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बौद्ध धम्मविषयक विचारांत सामाजिक समतेला मध्यवर्ती स्थान आहे. बुद्धांनी दुःख, त्याची कारणे आणि दुःखातून मुक्त होण्याचा मार्ग यांचे विवेचन केले. लोभ, द्वेष आणि मोह यांमुळे व्यक्तीचे जीवन अस्थिर होते, तर प्रज्ञा, करुणा आणि नैतिक आचरणामुळे अधिक संतुलित जीवन शक्य होते. अष्टांगिक मार्गातील सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाणी, सम्यक कर्म आणि सम्यक आजीविका यांसारख्या तत्त्वांचा अर्थ केवळ वैयक्तिक साधनेपुरता मर्यादित नाही. सत्यनिष्ठ संवाद, न्याय्य व्यवहार, अहिंसक वर्तन आणि इतरांच्या दुःखाविषयी संवेदनशीलता यांमधून त्यांची सामाजिक उपयुक्तता दिसते. डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धम्माचे आकलन आधुनिक समाजातील विषमता आणि मानवी हक्कांच्या प्रश्नांशी जोडले. त्यांच्या नवयान दृष्टिकोनात धर्माचे महत्त्व सामाजिक नैतिकता, समता आणि बंधुता यांना बळ देण्यात आहे.

सम्राट अशोक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक भूमिका एकसारख्या नव्हत्या; त्यांचे काळ, परिस्थिती आणि कार्यपद्धती वेगवेगळ्या होत्या. तरीही त्यांच्या विचारांत एक महत्त्वपूर्ण साम्य दिसते. अशोकाने युद्धविजयापेक्षा नैतिक धम्मविजयाला प्राधान्य दिले, तर आंबेडकरांनी जन्माधारित विषमतेऐवजी समता आणि मानवी प्रतिष्ठेवर आधारित समाजाचा आग्रह धरला. अशोकाने राज्यसत्तेला लोककल्याणाच्या जबाबदारीशी जोडण्याचा प्रयत्न केला; आंबेडकरांनी संविधान, लोकशाही आणि सामाजिक न्यायाच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला समान नागरिकत्व मिळावे यासाठी कार्य केले. दोघांच्या विचारांत मानवी कल्याणाला महत्त्व आहे. या साम्याचा विचार करताना त्यांच्या ऐतिहासिक संदर्भांतील भिन्नता लक्षात ठेवणे आवश्यक असले, तरी नैतिकता, करुणा, समता आणि लोकहित या मूल्यांची परंपरा समजून घेण्यासाठी त्यांचा तुलनात्मक अभ्यास उपयुक्त ठरतो.

आज भारतीय संविधानाने न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूलभूत मूल्ये स्वीकारली आहेत. मात्र प्रत्यक्ष सामाजिक जीवनात जातीय भेदभाव, अस्पृश्यतेची अवशेषरूपे, स्त्री-पुरुष असमानता, आर्थिक विषमता आणि धार्मिक विद्वेष यांसारखी आव्हाने कायम आहेत. माणसाची गुणवत्ता, कर्तृत्व आणि संवेदनशीलता यांपेक्षा त्याची जात, धर्म, भाषा किंवा जन्म यांना अधिक महत्त्व दिले जाते, तेव्हा लोकशाहीची मूल्ये कमकुवत होतात. सामाजिक माध्यमांवरील अफवा, द्वेषपूर्ण संदेश आणि असहिष्णुतेमुळे परस्परांबद्दल अविश्वास वाढण्याची शक्यता निर्माण होते. अशा वेळी धम्मविजयाचा अर्थ नव्याने समजून घेणे आवश्यक आहे. दुसऱ्याला कमी लेखणे, त्याचा अपमान करणे किंवा त्याच्या अधिकारांवर मर्यादा आणणे हा विजय नाही. स्वतःच्या पूर्वग्रहांवर मात करणे, अन्यायाविरुद्ध उभे राहणे, संवादाला प्राधान्य देणे आणि सर्वांना समान प्रतिष्ठा देणे हा खऱ्या धम्मविजयाचा मार्ग आहे.

शिक्षणाच्या क्षेत्रातही धम्मविजय आणि धम्मदीक्षेचा सामाजिक आशय उपयोगी ठरतो. शिक्षण म्हणजे केवळ पदवी मिळविणे किंवा रोजगार प्राप्त करणे नव्हे; ते विवेक, वैज्ञानिक दृष्टिकोन, चिकित्सक विचार आणि जबाबदार नागरिकत्व विकसित करणारे माध्यम आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना जात, धर्म, लिंग, भाषा किंवा आर्थिक परिस्थितीच्या आधारावर भेदभावाचा सामना करावा लागू नये. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची, पुराव्यांच्या आधारे निष्कर्ष काढण्याची आणि अन्यायाबद्दल संवेदनशील राहण्याची प्रेरणा द्यावी. संविधानिक मूल्ये आणि मानवी हक्क यांचे शिक्षण व्यवहाराशी जोडले गेले, तर समतेची जाणीव अधिक दृढ होऊ शकते. विचारस्वातंत्र्य, समान संधी आणि परस्पर आदर यांवर आधारित शैक्षणिक वातावरण निर्माण करणे ही धम्माच्या नैतिक मूल्यांना आधुनिक जीवनात स्थान देण्याची एक महत्त्वाची दिशा आहे.

धम्मविजयाचा विचार स्त्रियांच्या स्वातंत्र्याशी, दिव्यांग व्यक्तींच्या प्रतिष्ठेशी आणि वंचित समुदायांच्या हक्कांशीही जोडलेला आहे. स्त्रियांना शिक्षण, रोजगार, सुरक्षितता आणि निर्णयप्रक्रियेत समान संधी मिळणे आवश्यक आहे. दिव्यांग व्यक्ती, वृद्ध, आदिवासी समुदाय, भटके-विमुक्त समूह आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिक यांच्या गरजा समजून घेऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात समान सन्मानाने सहभागी करून घेणे ही न्याय्य समाजाची कसोटी आहे. करुणा म्हणजे केवळ सहानुभूती व्यक्त करणे नव्हे, तर अन्याय आणि अडथळे दूर करण्यासाठी प्रत्यक्ष कृती करणे होय. सामाजिक संस्थांनी आणि शासनाने सर्वसमावेशक धोरणे राबविली, तर बंधुतेचे मूल्य केवळ भाषणांमध्ये न राहता प्रत्यक्ष अनुभवता येईल.

धम्म विजयादशमीच्या निमित्ताने इतिहासाचे स्मरण करताना केवळ सम्राट अशोक किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे गौरवगान करून थांबणे पुरेसे नाही. त्यांच्या विचारांमधून प्रेरणा घेऊन आजच्या समाजातील अन्याय, विषमता आणि असहिष्णुता यांना सामोरे जाणे अधिक महत्त्वाचे आहे. अशोकाच्या धम्म विजयातून सत्तेच्या वापराला नैतिकतेची जोड देण्याची प्रेरणा मिळते, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मदीक्षेतून स्वाभिमान, विवेक आणि समतेसाठी संघर्ष करण्याचे बळ मिळते. आपल्या दैनंदिन व्यवहारात आपण इतरांना समान प्रतिष्ठा देतो का, भेदभावाला विरोध करतो का, दुर्बलांच्या हक्कांचे संरक्षण करतो का आणि संविधानिक मूल्यांचे पालन करतो का, हे प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारले पाहिजेत. धम्माचा खरा अर्थ आचरणात उतरल्याशिवाय सामाजिक परिवर्तन शक्य नाही.

धम्मविजयादशमीचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. शस्त्राच्या सामर्थ्याने मिळविलेला विजय तात्पुरता असू शकतो; परंतु विवेक, करुणा आणि न्याय यांच्या आधारे मिळविलेला विश्वास अधिक टिकाऊ असतो. सम्राट अशोकाने युद्धाच्या विनाशातून नैतिक विजयाचे महत्त्व अधोरेखित केले, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मदीक्षेच्या माध्यमातून सामाजिक समता आणि आत्मसन्मानाच्या नव्या अध्यायाला सुरुवात केली. या दोन्ही ऐतिहासिक वारशांचा सन्मान करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे जातिभेदमुक्त, विवेकनिष्ठ, करुणामय आणि न्यायपूर्ण समाजनिर्मितीसाठी सक्रिय योगदान देणे. माणसाचे मोठेपण दुसऱ्याला कमी लेखण्यात नसून त्याला समान प्रतिष्ठा देण्यात आहे, ही जाणीव समाजमनात रुजवली पाहिजे. द्वेषाऐवजी करुणा, वर्चस्वाऐवजी बंधुता आणि अंधानुकरणाऐवजी विवेक यांची निवड करणे, हाच धम्मविजयाचा खरा अर्थ आहे.

आयडीबीआय बँकेची विक्री बेकायदेशीर; केंद्र सरकारचा निर्णय देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी धोकादायक - विश्वास उटगी

विकासाचा पाया व आधार असलेली 'पब्लिक सेक्टर' बँकेची विक्री, विदेशी भांडवलशाहीला शरणागती - काँग्रेस'चे वरीष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी

पुणे : आयडीबीआय बँक ही देशाची राष्ट्रीय संपत्ती असून, तिची विदेशी कंपनीला विक्री करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय बेकायदेशीर आणि देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी धोकादायक आहे, असा आरोप बँकिंग अर्थतज्ज्ञ, बँक ऑफ महाराष्ट्राचे माजी संचालक आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या अर्थ विभागाचे अध्यक्ष विश्वास उटगी यांनी केला. नफ्यात सुरू असलेली बँक विदेशी गुंतवणूकदारांच्या ताब्यात देऊन केंद्र सरकार सर्वसामान्य नागरिकांच्या राष्ट्रीय संपत्तीवरील हक्कावर गदा आणत असल्याची टीकाही त्यांनी केली. या निर्णयाविरोधात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस रस्त्यावर उतरून आंदोलन करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आयडीबीआय बँक कॅनडातील फेअरफॅक्स या विदेशी कंपनीला विकण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर 'महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरीष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी पत्रकार परिषदेचे' आयोजन केले होते. यावेळी विश्वास उटगी यांनी सरकारच्या आर्थिक धोरणांवर जोरदार टीका केली.

उटगी म्हणाले, बँक ही राष्ट्राची



संपत्ती आहे. इंदिरा गांधीनी बँकांचे राष्ट्रीयीकरण केल्यावर याच बँकांच्या माध्यमातून देशात हरीत क्रांती, श्वेत क्रांती व विकसनशील राष्ट्राची पायाभरणी झाली. त्याच हेतूने राष्ट्रीयीकृत बँक 'विदेशी गुंतवणूकदारांना' विकण्याचा अधिकार कोणालाही नाही. यासंदर्भात २००४ मध्येही प्रश्न उपस्थित झाला होता. तत्कालीन भाजप सरकारने आयडीबीआय बँकेच्या विक्रीचा प्रयत्न केला होता; मात्र काँग्रेसने त्याला तीव्र विरोध केला. त्यानंतर बँकेतील विदेशी गुंतवणुकीवर मर्यादा घालण्याबाबत संसदेत निर्णय घेण्यात आला होता. आता केंद्र सरकार आपल्याच पक्षातील ज्येष्ठ नेत्यांनी घेतलेल्या भूमिकेला हरताळ फासत राष्ट्रीय संपत्ती विकण्याचा प्रयत्न करत आहे.

मोदी सरकारच्या नोटबंदीसह विविध आर्थिक निर्णयांमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम झाल्याचा आरोप करताना, केवळ विदेशी गुंतवणुकीच्या नावाखाली नफ्यात असलेली आयडीबीआय बँक विदेशी कंपनीच्या ताब्यात देणे योग्य नसल्याचे उटगी यांनी सांगितले. बँकेच्या विक्रीसंदर्भात संसदेत चर्चा होणे घटने प्रमाणे आवश्यक असून, संसदेची मंजुरी मिळाल्यानंतरच या प्रक्रियेला कायदेशीर स्वरूप प्राप्त होऊ शकते, असे मतही त्यांनी व्यक्त केले. आयडीबीआय बँकेची विक्री ५२ हजार ७५८ कोटी रुपयांना ठरल्याचा उल्लेख करत उटगी म्हणाले की, बँकेच्या मालकीच्या पुणे, मुंबई, हैदराबाद आणि देशातील इतर भागांतील जमिनींचे मूल्य एक लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचा त्यांचा दावा आहे. देशात सध्या केवळ १२ राष्ट्रीयीकृत बँका शिल्लक असून, सरकारच्या आर्थिक धोरणांमुळे त्यांचीही स्थिती धोक्यात येऊ शकते, असा इशारा उटगी यांनी दिला.

गोपाळदादा तिवारी यांनीही केंद्र सरकारवर साधला निशाणा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी म्हणाले की, 'अर्थव्यवस्थेतील तूट भरून काढण्याच्या व परकीय गुंतवणुकी'च्या गोंडस नावाखाली, केंद्र सरकार नफ्यातील व देशाच्या विकासाचा पाया असलेली राष्ट्रीयीकृत बँकेचा ५१% पेक्षा जास्त हिस्सा विक्री असंवैधानिकपणे करत आहे. बँक तोट्यात असताना एलआयसी व केंद्र सरकारने सर्व सामान्यांचे ४३,००० कोटी खर्च केले, मात्र हीच आयडीबीआय बँकेने जेंव्हा एनपीए'चे प्रमाण कमी करून, नफ्यात आली तेव्हा मात्र ती 'विदेशी भांडवली मर्यादा ५१% पेक्षा जास्त वाढवून (?) व भाजप'ने संसदेस दिलेल्या आश्वासनास मुठमाती देत मोदी सरकारने देशद्रोही विकण्याचा घाट असल्याची प्रखर टीका गोपाळदादा तिवारी यांनी केली. २०१४ अखेर (६४ वर्षांत १६ पंतप्रधानांच्या काळात) देशावरील असलेले ५५ लाख कोटींचे कर्ज एकट्या मोदी सरकारच्या कार्यकाळात ४ पटीने वाढून २२५ लाख कोटी झाले अशा परिस्थितीत देशाच्या उत्पन्नात व विकासात भुमिका बजावणारी राष्ट्रीय बँक विदेशी भांडवलशाही च्या गळ्यात घालणे आत्मघातकीपणाचे कृत्य असल्याचे तिवारी यांनी सांगितले.आयडीबीआय बँकेचा शेअर ९० रुपयांचा असताना त्याची विक्री विशेष सवलतीत (८१ रुपयांना) करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. त्यामुळे सरकार नफ्यातील बँक कमी किमतीत विकून सर्वसामान्य नागरिकांचा विश्वासघात करत असल्याची टीका त्यांनी केली.

अत्यावश्यक कामाची गरज नसताना करोडो रूपयांच्या कामातून खिसे भरण्याचे...

(पान १ वरून) करून नदीच्या घाटावर जाण्याची जरूरी नाही. आता आपल्यासाठी इथेच स्वच्छ पाण्याच्या हौदात पिंड विसर्जनाची सोय केली आहे. स्मशानफंड कमिटी पुणे, ट्रस्टी काही नावे आणि संपर्क नंबर देण्यात आला आहे. त्यातील अजून विशेष गोष्ट म्हणजे सुरूवातीलाच जिथे बापट साहेबांची पाटी लावण्यात आली आहे. तेथील कमानीवर नाव आहे ओंकारेश्वर दशक्रिया विधी घाट मुक्ती धाम पुणे महानगरपालिका या सर्व गोष्टी पाहिल्यानंतर पुणे महापालिकेचे २ ते ३ गुठ्यांची जागा बंदिस्त करणे अत्यावश्यक नसताना करोडो रूपयांची कामे काढून कररूपी जमा होणाऱ्या करोडो रूपये ठेकेदाराच्या माध्यमातून ओरबाडणे? असा विकास कोणत्याही पुणेकरांना मान्य नाही.

या गंभीर घटनेची दखल घेवून जिल्हाधिकारी कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था आणि सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन काय कारवाई करणार याकडे पुणेकरांचे लक्ष लागले आहे. राज्यसभेच्या खासदार मेधा विश्राम कुलकर्णी यांनी दि.१२/४/२०२५ रोजी जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय पुणे. यांना ओंकारेश्वर घाट शनिवार पेठ व ओंकारेश्वर मंदीर शनिवार पेठ येथे नुतनीकरण करणे. (फरशी बसविणे, रंगकाम करणे, दगडी फुटपाथ बसविणे, शेड बांधणे, कंपाऊंड वॉल बांधणे, बॉलपेंटींग करणे, पाणीपुरवठा व्यवस्था, ड्रेनेज लाईन दुरूस्ती, समाधी स्थळ दुरूस्ती, नदीकाठ सुधारणा इत्यादी,) या कामांना मंजुरी मिळणेबाबत सर्व साधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२०२५ अंतर्गत मागणी केली होती. यावर कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्र.५०२५ दि.३०/६/२०२५ च्या अनुषंगाने जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांनी दि.१/७/२०२५ रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, पुणे विभाग, पुणे यांनी सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत प्रस्तावित केलेल्या खालील कामांचे अंदाजपत्रक कामाच्या सविस्तर तपशिलासह या कार्यालयास सादर करण्यात यावे. अंदाजपत्रक सादर करताना खालील बाबींची पुर्तता होत आहे याची दक्षता घेण्यात यावी. तसेच या कामासाठी अटी व शर्ती देण्यात आल्या. या १) अंदाजपत्रक सादर करतांना ज्या कामासाठी अंदाजपत्रक मागविण्यात आलेले आहे त्याच कामाचे अंदाजपत्रक सादर करावे. कामाच्या नावात बदल करू नये तसेच सदरचे नाव सर्व प्रमाणापत्रांवर असणे आवश्यक आहे, २) अंदाजपत्रके तयार करताना ते चालू दर सुचीनसारच तयार करण्यात यावी. अंदाजपत्रक सादर करताना त्यास सक्षम अधिकारी यांची तांत्रिक मंजुरी घेऊनच सादर करावे. तसेच कामास तांत्रिक मंजुरी दिल्याबाबतचा आदेश अंदाजपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे. सदर आदेशात तांत्रिक मान्यतेचा क्रमांक आणि दिनांक स्पष्ट निर्देशित केलेला असावा, ३) एकदा सदर कामांचे अंदाजपत्रक या कार्यालयास सादर केल्यानंतर जागे अभावी अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव रद्द करता येणार नाही. त्यामुळे या बाबी अंदाजपत्रक सादर करण्यापुर्वी तपासून घ्याव्यात, ४) प्रस्तावित काम हे मनपा/नगरपालिका हद्दीत असल्यास संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचा ना-हरकत दाखला अंदाजपत्रकासोबत जोडलेला असावा, ५) प्रस्तावित कामाचे अंदाजपत्रक तयार करतांना त्यासाठी शासकीय जागा उपलब्ध आहे किंवा नाही याची खात्री करूनच अंदाजपत्रक तयार करावे. जागा शासकीय असल्याबाबतचे पुरावे जोडणे आवश्यक आहे. शासकीय जागा उपलब्ध होणेबाबत उडचण असल्यास वा खासगी जागा असल्यास अंदाजपत्रक सादर न करता त्याबाबत तात्काळ या कार्यालयास अवगत करावे, ६) प्रस्तावित केलेली कामे ही मोठ्या कामाचे लहान-लाहन भाग करून ती लहान कामे म्हणून घेण्यात येऊ नये. तसेच प्रस्तावित कामे ही एखाद्या मोठ्या कामाला कमी पडणारी पूरक म्हणून वा एखाद्या मोठ्या कामासाठी निरनिराळ्या स्त्रोतातून निधी मिळवण्याच्या प्रयत्नात एक स्त्रोत म्हणून घेण्यात येऊ नये. या प्रकारची कामे असल्यास अंदाजपत्रक पाठविण्यात येऊ नये व त्याबाबत तात्काळ या कार्यालयास कळविण्यात यावे, ७) प्रस्तावित योजनेत सदरचे अनुज्ञेय असल्याची खात्री करून घ्यावी. तसेच सदरचे काम हे सार्वजनिक स्वरूपाचे असणे आवश्यक आहे, ८) या कार्यक्रमांतर्गत कोणत्याही प्रकारच्या दुरूस्तीचे काम अनुज्ञेय नाही. अस्तित्वात असलेल्या कामाची कोणत्याही प्रकारची दुरूस्ती करता येणार नाही. तेव्हा दुरूस्ती स्वरूपाचे काम असल्यास अंदाजपत्रक पाठविण्यात येऊ नये. सदर कामांना प्रशासकीय मंजुरी दिल्यानंतर काम हे कोणत्याही प्रकारच्या दुरूस्तीचे असल्याचे निदर्शनास आल्यास सर्वस्वी कार्यान्वयीन यंत्रणेची जबाबदारी राहिल, ९) या कार्यक्रमांतर्गत खाजगी संस्थांची/सहकारी संस्थांची/वैयक्तिक लाभधारकांची कामे अनुज्ञेय नसल्याने अशा प्रकारची कामे असल्यास अंदाजपत्रक पाठविण्यात येऊ नये व त्याबाबत तात्काळ या कार्यालयास कळविण्यात यावे, १०) या कार्यालयास प्रस्तावित कामांचे अंदाजपत्रक प्राप्त झाल्यानंतर व कामांना प्रशासकीय मंजुरी दिल्यानंतर वरील अटी, शर्ती व निकष यांचे पालन झालेले नाही असे निदर्शनास आल्यास सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील, ११) योजनेच्या शासन निर्णयात वैयक्तिक लाभ स्वरूपाची कामे अनुज्ञेय नसल्यास प्रस्तावित काम अशा स्वरूपाचे नसून सार्वजनिक असल्याची खातरजमा करण्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील, १२) सदर काम हे प्रस्तावित केलेल्या योजनेव्यतिरिक्त अन्य कोणत्याही योजनेत समाविष्ट झालेले नसावे अथवा कोणत्याही पुर्वीच्या मंजुर कामाचे भाग नसावे. त्याबाबतचे प्रमाणपत्र अंदाजपत्रकासोबत सादर करावे, १३) सदर कामाचे, काम सुरू होण्यापुर्वी, काम प्रगतीत असतांना व काम पुर्ण झाल्यानंतर अशी किमान तीन छायाचित्र सादर करणे बंधनकारक आहे. तसेच कामाच्या ठिकाणी विहित केलेल्या नमुन्यात कोनशिला बसविणे आवश्यक आहे. यासाठी योग्य ती तरतूद अंदाजपत्रकात ठेवण्यात यावी, १४) सदर कामे पुर्ण झाल्यावर त्याची देखभाल/परिरक्षण करण्याबाबतचे विहीत नमुन्यातील हमीपत्र अंदाजपत्रकासोबत सादर करणे बंधनकारक आहे. असे मा.किरण इंदलकर, जिल्हा नियोजन अधिकारी, पुणे यांनी सांगितले आहे. यातील नियम व अटी किती काटेकोरपणे पाळण्यात आल्यात. हा संशोधनाचा विषय आहे. तसेच जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सचिव जिल्हाधिकारी मा.जितेंद्र डुडी यांनी या कामाला दि.२६/३/२०२६ रोजी मान्यता दिली आहे. पुणे सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाकरिता लेखाशिर्ष-पर्यटन विकासासाठी मुलभूत सुविधा करिता अनुदान ३४५२२१३२ ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या योजनेतून कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे, यांनी संदर्भीय पत्राव्दारे सादर केलेल्या प्रस्तावातील खालील योजनेतील समाविष्ट कामे/बाबींना पुढे नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. या आदेशामध्ये अटी-शर्ती एकूण ५० आहेत. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या आदेशाची अंमलबजावणी झाल्याचे किंवा होत असल्याचे दिसत नाही. म्हणून अशा कामांवर अत्याश्यक नसताना करोडो रूपयांनी खर्च करणे हे योग्य नाहीच पण याप्रकारची कामे पाहिल्यास पुणेकर नागरिक आणि महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकांचा कररूपी गोळा होणाऱ्या करोडो रूपये ओरबाडण्याचे काम ठेकेदाराच्या माध्यमातून चालू आहे? अशी शंका निर्माण होत आहे.